# ‘मेट्रो-३’ पुढच्या टप्प्यात!



म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाच्या उभारणीला मंगळवारी मोठी चालना मिळाली. या मार्गाच्या बांधकासाठी पाच कंत्राटदारांची नियुक्ती करण्याचा निर्णय मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. तब्बल १८ हजार ११४ कोटी रुपयांच्या या मार्गासाठी पाच कंत्राटदारांची निवड करण्यात आली असून हे काम सात पॅकेजमध्ये करण्यात येणार आहे. त्यात देशी तसेच परदेशी कंत्राटदारांचा समावेश आहे. या मार्गासाठी ‘जायका’ या वित्तसहाय्य देणाऱ्या जपानी वित्तसंस्थेने आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ही प्रक्रिया पार पडली.

**निवड झालेले कंत्राटदार आणि त्यांनी उभारावयाची स्टेशने**

■ **२९८८.५३ कोटी**
मेसर्स एल अँड टी-एसटीईसी जेव्ही
**कफ परेड, विधानभवन, चर्चगेट, हुतात्मा चौक.**

■ **२५२३ कोटी**
मे. एचसीसी-एमएमएस जेव्ही
**सीएसटी मेट्रो, काळबादेवी, गिरगाव, ग्रँटरोड**

■ **२५५७.८४ कोटी**
मे. डोगस-सोमा
**मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी मेट्रो, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक, वरळी**

■ **२८३०.१० कोटी**
मे. सीईसी-आयटीडी सीईएम-टीपीएल जेव्ही
**सिद्धिविनायक, दादर मेट्रो, शितलादेवी.**

■ **२८१७.०२ कोटी**
मे. जे. कुमार-सीआरटीजी
**धारावी, बीकेसी मेट्रो, विद्यानगरी, सांताक्रूझ.**

■ **२११८.४० कोटी**
मे. जे.कुमार-सीआरटीजी
**छत्रपती शिवाजी महाराज आंतराष्ट्रीय तसेच डोमस्टिक विमानतळ, सहार रोड, सीएसए इंटरनॅशनल**

■ **२२८१.४५ कोटी**
मे. एल अँड टी – एसटीईसी जेव्ही
**मरोळ नाका, एमआयडीसी, सीप्झ.**